मा.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर यांनी रिव्हीजन यु.एल.पी. क्र.६०, ७०, ९४, १२६, २२१/१९९० व ५३/१९९२ मध्ये दि.१५/१२/१९९४ रोजी दिलेल्या एकत्रित <u>आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत.</u>

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : एस-३०/२०१८/प्र.क्र.२७७/वने-१२**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ६ मे, २०२६.

<u>वाचा :-</u> १) शासन निर्णय क्र.एस-३०/२०१८/प्र.क्र.२७७/फ-१२, दि.०३/०१/२०१८.

२) मा.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर यांचा रिव्हीजन युएलपी क्र.६०, ७०, ९४, १२६, २२१/१९९० व ५३/१९९२ मधील दि.१५/१२/१९९४ चा न्याय निर्णय.

३) मा.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर यांचा रिक्व्हरी ॲप्लीकेशन (युएलपी) क्र.०६/२०१७ मधील दि.२०/०६/२०२५ चा न्याय निर्णय.

४) मा.कामगार न्यायालय, कोल्हापूर यांनी प्रकरण क्र.२९/२०१७ मध्ये, दि.१७/०१/२०२६ रोजी दिलेले तोंडी आदेश.

५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-७ /आस्था-३/प्र.क्र.६३/०८-०९/८०/१५-१६, दि.२५/०१/२०२६.

६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-३१ /विधी/प्र.क्र.६३(२५-२६)/९८०/२५-२६, दि.१६/०१/२०२६.

७) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-३१ /विधी/प्र.क्र.६३(२५-२६)/११७६/२५-२६, दि.१३/०३/२०२६.

८) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.वेतन-१०१८/प्र.क्र.३४/सेवा-३, दि.१७/०८/२०२३.

<u>प्रस्तावना :-</u>

कोल्हापूर वन विभाग व सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर येथील ४२४ मजूरांनी त्यांना कायम करून, तद्नुषंगाने कायमपणाचे फायदे देण्यात यावेत या मागणीकरीता करवीर कामगार संघ, कोल्हापूर तर्फे मा.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर येथे तक्रार युएलपी क्र.६०, ७०, ९४, १२६, २२१/१९९० व ५३/१९९२ दाखल केल्या होत्या. सदर प्रकरणी मा.न्यायालयाने दि.१५/१२/१९९४ रोजी शासनाच्या विरोधात निर्णय दिला. सदरहू निर्णयाविरुध्द शासनाच्या वतीने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.६२००/१९९५ दाखल करण्यात आली असून, सदरहू याचिका मा.न्यायालयाने दि.२१/१२/१९९५ च्या आदेशान्वये फेटाळली. तद्नंतर, शासनाच्या वतीने मा.उच्च न्यायालयात रिव्ह्यु पिटीशन दाखल करण्यात आली असून सदर रिव्ह्यु पिटीशन मा.न्यायालयाने फेटाळली. त्यानंतर शासनाच्या वतीने मा.उच्च न्यायालयात दाखल एल.पी.ए. देखील मा.न्यायालयाने फेटाळला आहे. तद्नंतर मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (SLP) क्र.८३९/२०१२ दाखल केली. मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२३/०१/२०१२ च्या आदेशान्वये विशेष अनुमती याचिका खारीज केली. यास्तव मा.औद्योगिक न्यायालयाच्या दि.१५/१२/१९९४ च्या आदेशास अंतिम स्वरुप प्राप्त झाले.

२.	मा.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर यांनी दि.१५/१२/१९९४ रोजी दिलेल्या एकत्रित निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने एकूण १७२ मजुरांना एकूण थकबाकी रक्कम रु.२,६५,३०,२३९/- मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), नागपूर यांच्याकडून दि.२५/०१/२०१६ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला होता. त्यानुसार सदर प्रस्तावास सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने दि.०३/०१/२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. तथापि, कोषागार कार्यालयाने आक्षेप नोंदविल्यामुळे देयक मंजूर होऊ शकले नाही.

३.	तद्नंतर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), नागपूर यांच्या दि.२३/१०/२०१८ च्या पत्रान्वये सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केला. त्यानुसार मा.औद्योगिक न्यायालयाच्या दि.१५/१२/१९९४ रोजीच्या एकत्रित निर्णयामधील अनुक्रमांक-४ येथील निर्देशानुसार सलग सेवेची ३ वर्षे ज्या दिनांकापासून पूर्ण होतील त्या दिनांकापासून संबंधित मजुरांना कायमपणाचे फायदे द्यावयाचे असल्याने त्यानुसार स्वयंस्पष्ट प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत दि.१६/०४/२०१९ च्या शासन पत्रान्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), नागपूर यांना कळविण्यात आले.

४.	त्यानुसार, मा.औद्योगिक न्यायालयाच्या दि.१५/१२/१९९४ च्या निर्णयानुसार, सलग सेवेची ३ वर्षे ज्या दिनांकापासून पूर्ण होतील त्या दिनांकापासून संबंधित मजुरांना कायमपणाचे फायदे द्यावयाचे असल्याने मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांनी सादर केलेल्या संबंधित मजुरांना देय होणाऱ्या सुधारित परिगणनेनुसार रक्कम रु.२,५९,५३,४७७/- (रुपये दोन कोटी एकोणसाठ लक्ष त्रेपन्न हजार चारशे सत्यात्तर फक्त) इतके अनुदान उपलब्ध करुन देण्याची विनंती प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), नागपूर यांनी त्यांच्या दि.२१/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास केली आहे.

| अ. क्र. | विवरण | एकूण मजूर | मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार पात्र असलेले मजूर | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | दि.३१/०१/१९९६ च्या शासन निर्णयान्वये दि.०१/११/१९९४ पासून कायम झालेल्या वनमजुरांची संख्या | १७० | १४९ | १,२९,३०,१२९/- |
| २ | दि.१६/१०/२०१२ च्या शासन निर्णयान्वये दि.०१/०६/२०१२ पासून कायम झालेल्या वनमजुरांची संख्या | १८ | १३ | १,१९,१७,०६६/- |
| ३ | उपरोक्त दोन्ही शासन निर्णयान्वये कायम न झालेल्या रोजंदारी मजुरांची संख्या | ३५ | ९ | ११,०६,२८२/- |
| | **एकूण** | **२२३** | **१७१** | **२,५९,५३,४७७/-** |

५.	सदरहू प्रस्ताव परिपुर्ण नसल्याने काही मुद्दांची माहिती प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), नागपूर यांच्याकडून शासनाच्या दि.०४/०१/२०२३ व दि.२८/०६/२०२४ च्या पत्रान्वये मागविण्यात आली.

६.	सदर प्रकरणी मा.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर यांनी दि.१५/१२/१९९४ रोजी दिलेल्या एकत्रित निर्णयाची अंमलबजावणी न झाल्याने सदरहू मजूरांनी मा.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर येथे रिक्व्हरी ॲप्लीकेशन युएलपी क्र.०६/२०१७ दाखल केली. सदर प्रकरणी मा.न्यायालयाने रक्कम अदा करण्यास तक्रारदारांना तांत्रिक अडचण येत असल्यामुळे सुधारित परिगणना केल्याने येणारी एकूण रक्कम रु.२,५९,५३,४७७/- मा. न्यायालयात दि.३१/०७/२०२५ पर्यंत भरण्यात यावी जेणेकरुन तक्रारदार मजूरांनी वैयक्तीकरित्या दाखल केलेले क्लेम त्यांना मा. न्यायालयामार्फत अदा करण्यात येतील असे आदेश दि.२०/०६/२०२५ रोजी पारीत केले.

७.	प्रस्तुत प्रकरणी, मा.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर यांनी रिक्व्हरी ॲप्लीकेशन युएलपी क्र.०६/२०१७ मध्ये, दि.२०/०६/२०२५ व मा.कामगार न्यायालय, कोल्हापूर यांनी प्रकरण क्र.२९/२०१७ मध्ये, दि.१७/०१/२०२६ रोजी दिलेले आदेश विचारात घेता, मा.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर यांनी तक्रार युएलपी क्र. ६०, ७०, ९४, १२६, २२१/१९९० व ५३/१९९२ मध्ये दि.१५/१२/१९९४ रोजी दिलेल्या एकत्रित निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या भाग म्हणून संबंधित मजुरांना कायमपणाचे फायदे द्यावयाचे असल्याने यापुर्वी निर्गमित करण्यात आलेला दि.०३/०१/२०१८ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करुन सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

मा.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर यांनी तक्रार युएलपी क्र. ६०, ७०, ९४, १२६, २२१/१९९० व ५३/१९९२ मध्ये दि.१५/१२/१९९४ रोजी दिलेल्या एकत्रित निर्णय, मा.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर यांनी रिक्व्हरी ॲप्लीकेशन युएलपी क्र.०६/२०१७ मध्ये, दि.२०/०६/२०२५ व मा.कामगार न्यायालय, कोल्हापूर यांनी प्रकरण क्र.२९/२०१७ मध्ये, दि.१७/०१/२०२६ रोजी दिलेले तोंडी आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने, प्रस्तुत प्रकरणातील प्रस्तावनेत नमूद तक्त्यातील संबंधित मजुरांना कायमपणाचे फायदे द्यावयाचे असल्याने त्यांना देय होणाऱ्या सुधारित परिगणनेनुसार रु.२,५९,५३,४७७/- (अक्षरी रुपये दोन कोटी त्रेप्पन लाख चारशे सत्याहत्तर रुपये फक्त) इतकी रक्कम मा. औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर येथे जमा करण्यासाठी इतकी रक्कम मागणी क्र. सी ७, २४०६ वनीकरण व वन्यजीवन १०१ वनसंधारण व विकास १०१ (१२) वन मजुरांच्या अधिसंख्य पदांची निर्मिती (२४०६-१८९८) “०१-वेतन” या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध करुन देण्यास या शासन निर्णयान्वये खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ) प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणाची संपूर्ण जबाबदारी मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांची राहील.

ब) सदर प्रकरणी मजुरांना अदा करावयाच्या थकबाकीची अचुक परिगणना करण्याची जबाबदारी मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांची राहील.

क) सदरील देयक विहित कालावधीत अदा करण्याची जबाबदारी मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांची राहील.

२.	उक्त खर्च मागणी क्रमांक सी-७, २४०६ वनीकरण व वन्यजीवन, १०१ वनसंरक्षण, विकास व पुनर्निर्मिती, (१२) वन कामगारांसाठी अधिसंख्य पदांची निर्मिती, (१२) (०१) वन कामगारांसाठी अधिसंख्य पदांची निर्मिती (अनिवार्य), (२४०६-१८९८) ०१-वेतन या लेखाशिर्षातंर्गत सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

३.	सदरचा शासन निर्णय, वित्त विभाग, अनौ.संदर्भ क्र.३५०/व्यय-१०, दि.२४/०४/२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०५०६१३३३५५२८१९ असा आहे. सदरचा शासन निर्णय डिटीजल स्वाक्षरीने सांक्षाकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANJUSHA DATTATRAY SONJE

Digitally signed by MANJUSHA DATTATRAY SONJE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=8E491E40DA312B87356D474F3637BDB55DFF1AA207B1723030265AD04926CADB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=14ABD3DD33A977D709D803B6057EB9FE0DE69BD4ACD4BF7CA36CED00F53EA72C, cn=MANJUSHA DATTATRAY SONJE
Date: 2026.05.06 13:34:47 +05'30'

**(मंजुषा सोनजे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
५) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर.
६) उपवनसंरक्षक, कोल्हापूर.
७) जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर.
८) कार्यासन अधिकारी (व्यय-१०), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) कार्यासन अधिकारी (ब-१ / वने-२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवडनस्ती (वने-१२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.